P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad, Maharashtra - 41



प्रेसनोट **दिनांक – २४/११/२०२६**

दि. २३/११/२०२६ रोजी राञौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

०१.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	हिंजवडी १०५६/२०२६ भा.न्या.सं. कलम १०३ (१) प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि २३/११/२०२६ रोजी रात्रौ ००.३० वा ते ०१ :०० वा दरम्यान रुम नं २०६ प्रिस्टीन पी.जी. साखरेवस्ती, हिंजवडी ता मुळशी जि पुणे
गुन्हा दाखल	:-	दि २३/११/२०२६ रोजी १९.०९ वा
फिर्यादी	:-	अक्षय दिलीपराव भोंग वय ३४ वर्षे व्यवसाय सॉफ्टवेअर इंजिनीअर बजाज जनरल इन्सोरन्स रा. के/ऑफ मनोज गोळे, फ्रेशिया सोसायटी फ्लॅट नं ३०१, ए विंग बीटवाईज झॅवरच्यामागे सुसगाव ता.मुळशी जि. पुणे मूळ रा. मु.पो.चांदोरेनगर, धामणगाव रोड, ता. जि. यवतमाळ
आरोपी	:-	शुभम ज्ञानेश्वर काळबांडे, वय ३० वर्षे, धंदा- खाजगी नोकरी, रा- सध्याचा पत्ता- गजानन पीजी.रुम नं-५०३ साखरेवस्ती, हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे मुळगांव- सेनगांव पोलीस ठाणेजवळ, लक्ष्मीनगर, सेनगांव ता.सेनगांव, जि.हिंगोली.
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी व मयत कोमल राजेंद्र डहाके वय २७ वर्षे यांचे प्रेमसंबध होते. आरोपी याचे दुस-या मुलीसोबत प्रेमसंबध असल्याचे संशयावरुन आरोपी व कोमल राजेंद्र डहाके यांचेत भांडणे होवुन भांडणामध्ये आरोपी याने कोमलला भिंतीवर व बेडवर आपटुन व तिच्या चेह-यावर हाताने बुक्क्यांनी मारहाण करुन तिचा खुन केला आहे म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	सपोनि वांगणेकर ९६२३६९८८९९

०२.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	तळेगाव दाभाडे ५२९/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १३८, १४०(३) प्रमाणे **कलम वाढ भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ३(५)**
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि २२/११/२०२६ रोजी १९.०० वा चे सुमा टाटा हाउसींग सोसायटी ए वन वींग फ्लॅट नं ४१२ सोमाटणे फाटा तळेगांव दाभाडे ता. मावळ जि.पुणे
गुन्हा दाखल	:-	दि २३/११/२०२६ रोजी ०१.५३ वा
फिर्यादी	:-	महिला फिर्यादी
आरोपी	:-	१) सिध्देश भगवान साळुंके वय २३ वर्षे रा सडवली ता मा मावळ जि पुणे २) संदिप बाळु चव्हाण वय २६ वर्षे रा भहुरवाडी ता मावळ जि पुणे
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादीचे पती योगेश अरुण भांमरे वय ३६ वर्ष, हे त्यांचा मिञ नामे सिध्देश भगवान साळुंके वय २३ वर्ष, रा सडवली ता मावळ जि पुणे येथुन फिर्यादीचा मुलगा नामे दुर्वेश यास खाणेकरिता खरवस घेवुन येतो असे सांगुन घरातुन निघुन गेले आहेत ते परत घरी आले नाही. फिर्यादीचे पती योगेश अरुण भांमरे वय ३६ वर्ष यास क्रमांक १ याने खरवस देण्याचे बहाण्याने उर्से येथे बोलवून घेऊन उर्से येथून बुलेट वर बसून घेऊन जाऊन मौजे ओझर्डे शिवारात नेऊन तेथे आरोपी क्र २ याचे सहाय्याने एक महिन्यापूर्वी झालेल्या वादाचे कारणावरून मयत यास कोयत्याने डोक्यात तसेच काठीने मारहाण करून गंभीर जखमी करून त्याचा खून केला असल्याबाबत चे पोलिस ठाणे शिरगाव परंदवाडी येथून रिपोर्ट सह, MLC पत्रक,मरणोत्तर पंचनामा, घटनास्थळ पंचनामा ,व मुद्देमाल, अँडव्हान्स डेथ सर्टिफिकेट, स्टेशन डायरी उतारे प्राप्त झाल्याने गुन्हा रजिस्टर क्रमांक ५२९/२०२६ कलम १३८,१४०(३) bns मध्ये कलम १०३(३),३(५) प्रमाणे कलम वाढ करण्यात आली आहे.
त.अधिकारी/अंमलदार	:-	सपोनि वाघुले ७७७४०१८१११

०३.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	वाकड ८४६/२०२६ भारतिय न्याय संहिता कलम १०९(१), ३५२, ३५१(२)(३), ३(५) प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि २२/११/२०२६ रोजी रात्री २१.३० वा चे सुमारास महिंद्रा हॅपिनेस सोसा समोर जीवननगर, ताथवडे, ता. मुळशी जि. पुणे येथे
गुन्हा दाखल	:-	दि २३/११/२०२६ रोजी १३.२० वा
फिर्यादी	:-	ओमप्रकाश सुरेश तर्डे वय २१ वर्षे, धंदा डिलिव्हरी बॉय, रा सध्या स्पार्क क्रिकेट मैदाना जवळ, जांबे पुनावळे रोड रसिकवाडी पुणे मुळगाव थोडगे ता. अहमदपुर जि. लातुर
आरोपी	:-	१)शुभम सुदाम राऊत, वय २८ वर्ष, धंदा- डिलेव्हरी बॉय, रा. शिवशंकर हौसा. सोसायटी नंबर-०१, म्हैत्रे वस्ती चिखली, पुणे मुळगाव- पुर वस्ती, कन्हेरसर, ता. राजगुरूनगर, पुणे २)विक्रांत विष्णु भोसले, वय २३ वर्ष, धंदा- ड्रायव्हर, रा. सिध्दीविनायक सोसायटी, चिंचेचा मळा टॉवर लाईन, मोरे वस्ती, चिखली पुणे, मुळगाव- सोलापुर मोहळ, खवणी सोलापुर
तपशिल	:-	वरील नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना फ्लिपकार्ट मिनीट कंपनीची ऑर्डर टाकण्यावरुन दोन मुलांनी शिवीगाळ केली होती सदरबाबत फिर्यादीने त्याचा मित्र व्यंकटेश घुगे यास सांगितले होते त्यानंतर दि २२/११/२०२६ रोजी २१.३० वा चे सुमारास फिर्यादी फ्लिपकार्ट मिनीट कंपनीची ऑर्डर टाकुन जीवननगर, ताथवडे येथुन जात असताना कंपनीने फेक ऑर्डर टाकण्यास बंदी घातलेले व आदल्या दिवशी याच कारणावरुन वाद घालणारा आरोपी क्र १ व २ यांनी मोटारसायकलवरुन येऊन फिर्यादीस अडवुन " तु ऑर्डर का टाकत आहेस, तुला आता जिवंत सोडत नाही, आता संपवतोच" असे म्हणुन आरोपी क्र १ याने त्याचेकडील कोयत्याने फिर्यादीचे डोक्यावर वार केला असता तो फिर्यादीने चुकवत असताना फिर्यादीच्या डाव्या हाताच्या मनगटावर तसेच उजव्या हाताच्या करंगळीवर कोयत्याने वार करुन फ्रॅक्चर व गंभीर जखमी करुन फिर्यादीस जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	सपोनि दराडे ९७०२४४२२८१

०४.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	बावधन ७४३/२०२६ बी,एन,एस कलम. ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) ३(५) प्रमाणे.
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि २२/११/२०२६ रोजी रात्रौ ११/४५ वा. च्या सुमारास ऍव्हान व्हिस्टा सोसायटीच्या समोर मुंबई लेन वर महाळुंगे पुणे येथे
गुन्हा दाखल	:-	दि २३.११.२०२६ रोजी ०९.२२ वा
फिर्यादी	:-	आशिष रामेश्वर तांगडे वय. २९ वर्षे, धंदा. खाजगी नोकरी रा. दगडू पाटीलनगर, लेन नं. ०१, मनपा शाळेच्या समोर, थेरगांव पुणे मुळगांव- केसापुरी ता. वडवणी जि. परभणी
आरोपी	:-	लाल रंगाची स्कोडा नं. एम.एच. १२ आर. एफ. ५३२९ वरील चालक
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी हे पायी चालत जात असताना ऍव्हान व्हिस्टा सोसायटीच्या समोर महाळुंगे येथे मुंबई लेन वर तीन गाडयांचा अपघात झाला होता फिर्यादी त्यांना मदत करण्यासाठी गेले असता इंडिका कार व लाल रंगाची स्कोडा नं. एम.एच. १२ आर. एफ. ५३२९ यांच्यामध्ये भरपाई देण्यावरुन वाद झाला फिर्यादी हे त्यांच्या मध्ये मध्यस्थी करुन भांडण सोडवित असताना लाल रंगाची स्कोडा नं. एम.एच. १२ आर. एफ. ५३२९ वरील चालकाने "तु कोण आहे तुझा काय संबध आहे तु का मध्ये पडतो" असे बोलुन शिवीगाळी करुन रागाच्या भरात फिर्यादीस हाताने व स्टीलच्या कडयाने डाव्या डोळयाच्या वर कपाळावर मारुन जखमी केले आहे. म्हणून
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोउपनि फड ९०११०५१३५७

०५.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	दापोडी ४४८/२०२६ भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५२ प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि २३.११.२०२६ रोजी ०२.०० वा.चे सुमा गुलाब काटे चाळ दापोडी पुणे येथे
गुन्हा दाखल	:-	दि २३.११.२०२६ रोजी ०६/२१ वा
फिर्यादी	:-	प्रथमेश ऊर्फ गणेश शंकर चलवारे वय २१ वर्षे धंदा खजगी नोकरी रा. गुलाब काटे चाळ वॉर्ड नंबर ३ जयभिमनगर दापोडी पुणे १२
आरोपी	:-	प्रतिक धोंडीबा भालेराव वय २२ वर्षे रा. वॉर्ड नंबर ३ युवराज गायकवाड यांचे दुकानाचे जवळ दापोडी पुणे
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांच्या घरी आले असताना फिर्यादींच्या ओळखीचा आरोपी हा फिर्यादीच्या घराजवळ आला व फिर्यादी व आरोपी मध्ये झालेल्या जुन्या भांडणाचा राग मनात धरुन आरोपी याने फिर्यादीस शिवीगाळी करुन हाताने मारहान करुन तेथे पडलेला सिमेंटचा गट्टु फिर्यादीच्या डोक्यात मारुन फिर्यादीस जखमी केले आहे. म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोहवा/८६४ गारडे ९८९२८४६८५०

०६.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	आळंदी ६५७/२०२६ बीएनएस कलम ११८(१) प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि २३/११/२०२६ रोजी ०९.००वा चे सुमा, गणेश मंदीर समोर, पीएमटी चौक, आळंदी, ता खेड जिल्हा पुणे
गुन्हा दाखल	:-	दि २३/११/२०२६ रोजी १६.०५ वा
फिर्यादी	:-	महादेव दौलत कोळेकर वय ६५ वर्षे, व्यवसाय मजुरी र वारकरी मिसळ समोर फुटपाथवर आळंदी ता खेड जिल्हा पुणे, मुळ गाव मु पो नांदल, ता- फलटण, जिल्हा सातारा ४१५५२८
आरोपी	:-	पांडुरंग कृष्णा चोपडे वय ५५ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. आळंदी ता. खेड, जि.पुणे, मुळगाव मु.पो.दानोळी, ता. शिरोळ जि. कोल्हापुर
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने काल झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन रस्त्यावरील दगड उचलुन फिर्यादी यांना मारहाण करुन त्यांचे डोक्यास व डावे हातावर दुखापत करण्यास कारणीभुत झाला, तसेच फिर्यादी यांचा मित्र नामे संतोष रंगनाथ चालक, वय ४१ वर्षे, यास दगडाने मारहाण करुन त्याचे डोक्यावर डावे बाजुस मारुन दुखापत केली आहे म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोहवा/१२८९ काठे ९५२७७६०२४३

०७.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	शिरगाव ३५०/२०२६ भा.न्या.सं. कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५), १२६(२) प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि २२/११/२०२६ रोजी १७/३० वा चे सुमा गहुंजे मंदिराजवळ रस्त्यावर ता. मावळ जि.पुणे
गुन्हा दाखल	:-	दि २३/११/२०२६ रोजी १९.०८ वा
फिर्यादी	:-	राहुल विजय दुबे वय २४ वर्षे धंदा वेल्डींग रा.संजु धुमळ यांचे भाडयाचे खोलीत शिरगाव ता मावळ जि पुणे मुळ रा.इलाहाबाद ता.कुडा जि.प्रयागराज उत्तर प्रदेश
आरोपी	:-	१) रुपेश राजपुत वय ३४ वर्षे २) विनायक राजपुत वय २६ वर्षे, ३) योगेश राजपुत वय २८ वर्षे ४) रोहन उर्फ बंटी राजपुत वय २४ वर्षे सर्व रा. कंजारभट वस्ती शिरगाव ता. मावळ पुणे
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची ऑक्टोबर मध्ये आरोपी क्र १ याचेसोबत झालेल किरकोळ बाचाबाचा राग मनात धरुन यातील आरोपी क्र १ याने फिर्यादी हे गहुंजे वरुन घरी जात असताना गहुंजे मंदिराजवळ रस्त्यावर फिर्यादी यांना अडवुन त्यांचे गाडीची चावी काढुन घेवुन फिर्यादी यांचे वडीलांना फोन करुन तुमच्या मुलाला आज घालवुन टाकतो असे बोललेने फिर्यादी हे पुढे चालत जात असताना त्यांचे आईवडील तेथे आले त्यावेळी आरोपी क्र १ याने फिर्यादी यांचे आईवडीलांना शिवीगाळ केली व आरोपी क्र २ ते ४ यांना फोन करुन बोलवुन घेवुन आरोपी क्र १ ते ४ यांनी फिर्यादी यांना लोखंडी पाईप व लाथा बुक्क्यांनी मारहान करुन जखमी केले आहे म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोहवा/८२६ दिघे ९८९०९८५८१७

०८.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	निगडी १०४१/२०२६ भा.न्या.सं. २०२३ चे कलम ३१८(४) माहिती तंत्रज्ञान अधि.-२००० चे कलम ६६ डी प्रमाणे.
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि. २०/११/२०२६ रोजी रात्री ०७.२५ वा ते २०.०९ वा चे दरम्यान ऐश्वर्यम डीर स्टोन ऑफिस नं ३०५, म्हाळसाकांत चौक, आकुर्डी पुणे
गुन्हा दाखल	:-	दि २३/११/२०२६ रोजी १५.३१ वा
फिर्यादी	:-	ओमेश उद्धवराव बिराजदार वय ३२ वर्षे धंदा बांधकाम व्यवसाय रा. बी ८०५,अर्बन स्कायलाइन, फेज १, बी आर टी रोड रावेत पुणे.
आरोपी	:-	अज्ञात इसम
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना कोणीतरी अज्ञात इसमाने filpkartcustomerservics@gmail.com या आयडी वरुन गुगल मीटवर व्हाईस कॉल करुन फिर्यादी यांनी फ्लिपकार्ड वर ऑर्डर केलेला मोबाईल आता डिलेव्हरी पत्त्यावर पाठवु का असे विचारले असता, फिर्यादी यांनी सदरचा मोबाईल घेण्यास कोणीही नसल्याचे सांगितल्याने त्यांने दुसरा पत्ता देण्यास सांगितला तेव्हा फिर्यादी यांनी फ्लिपकार्ड ॲप वरील हेल्पडेस्कद्वारे मोबाईल डिलेव्हरी पत्ता व मोबाईल मिळणेबाबतची विनंती टाकली. तसेच मोबाईल डिलेव्हरी साठी उशीर झाल्याने त्याचा मुआवजा मिळण्यासाठी समोरील अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांचे फ्लिपकार्ड वर जतन असलेले कार्डपैकी ज्याकार्ड मध्ये सदरची रक्कम जमा करायची आहे. त्या कार्डचे शेवटचे चार अंक चेक करण्यास सांगितले तेव्हा फिर्यादी यांनी त्यांचे आयसीआयसीआय बॅकेचे प्लॅटिनियम रुपे क्रेडीट कार्डचे शेवटचे चार अंक त्यास सांगितले असता रात्री २०.०९ वा चे सुमारास कॉल चालु असताना फिर्यादी यांचे क्रेडीट कार्ड मधुन एकुण २,१८,९९९/- रुपये व आयसीआयसीआय बॅक डेबिट कार्ड यामधुन ३,२५६/- रुपये असे एकुण २,२२,२५५/- रुपये फिर्यादी यांचे संमतीशिवाय काढुन घेवुन फसवणुक केली आहे. म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोनि जाधव ९८२३५१८९५५

०९.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	उत्तर महाळुंगे २५१/२०२६ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १०५, २८१, १२५(अ), १२५(ब) मोटार वाहन अधिनियम १९८८ कलम १८४, १३४(अ) १३४(ब)
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि २३/११/२०२६ रोजी ११.३५ वा. दरम्यान पाईट कडून धामणे कडे जाणारे रोडवरून, कात्रज दुध शितकरण केंद्र पाईट चे समोरील रोडवर, ता.खेड जि.पुणे
गुन्हा दाखल	:-	दिनांक-२३/११/२०२६ रोजी १८.५८ वा
फिर्यादी	:-	रोहिदास महादेव गडदे, वय ५६ वर्षे, व्यवसाय शेती, रा. शिवे, ता. खेड, जिल्हा पुणे.
आरोपी	:-	हायवा ट्रक नंबर एमएच १४-एच यु ८३८५ वरील चालक श्री प्रविण श्रीधर चौधरी, वय ३६ वर्षे रा. खरपुडी बु., ता. खेड जि. पुणे
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी जाणारी हिरो मेस्ट्रो कंपनीची टु व्हीलर गाडी नंबर एमएच-१४-एफके-१८५६ हिचे वरून पोपट अनंता रौधंळ हे जात असतांना, त्यांचे पाठीमागून जात असलेला हायवा ट्रक नंबर एमएच १४-एच यु ८३८५ या वरील अज्ञात चालक याने हिरो मेस्ट्रो कंपनीची टु व्हीलर गाडीस ओव्हर टेक करत असताना धक्का लागल्यास त्यांचे जिवीतास धोका निर्माण होऊ शकतो हे माहित असताना सुध्दा हायवा चालक याने जाणीवपुर्वक, वाहतुकीचे नियमांकडे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन, हयगयीने, निष्काळजीपणे व भरधाव वेगाने हायवा चालवून त्यांचे डाव्या बाजूने जात असलेली हिरो मेस्ट्रो कंपनीची टु व्हीलर गाडी नंबर एमएच-१४-एफके-१८५६ हिचे वरील पोपट अनंता रौधंळ रा. पाईट ता. खेड, जिल्हा पुणे यांना हायवा ट्रक नंबर एमएच १४-एच यु ८३८५ या वरील अज्ञात चालक याने ओव्हर टेक करत असताना त्याचे पुढील बाजूने जाणीवपुर्वक जोरात धडक देवून अपघात करुन, त्यांना गंभीर जखमी करुन, त्यांचे मरणास कारणीभूत होवून, अपघाताची खबर न देता घटनास्थळावरुन पळून गेला. म्हणून
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोउपनि जावळे ७८७५७०४१६२

१०

पोस्टे व गु रजि.नं.	:-	उत्तर महाळुंगे २४९/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७१, २७२, ३(५)
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि २२/११/२०२६ रोजी रात्रौ २१.४० वा. चे सुमा मौजे खालुंब्रे गावातील हद्दीत एचपी पेट्रोल पंपाचे बाजूचे गल्लीमध्ये, खालुंब्रे गाव, ता. खेड, जि. पुणे.
गुन्हा दाखल	:-	दि २३/११/२०२६ रोजी ०६.३७ वा
फिर्यादी	:-	रोहित संजय शिंत्रे, वय ३१ वर्षे, पोलीस शिपाई ४६१९, नेमणुक- उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन,पिंपरी-चिंचवड.
आरोपी	:-	१)निशांत रमाकांत उपाध्याय, वय २३ वर्षे रा. खालुंब्रे गाव, एचपी पेट्रोल पंपाजवळ पुणे मुळगाव गाव सिंगटोली, पो. इटोन, ता. माधोगड, जि. जालोन, उत्तर प्रदेश २) दयाशंकर दुबे ऊर्फ दयाशंकर द्विवेदी वय ३९ वर्षे, रा. देहूगाव, पुणे
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र १ याने आरोपी क्र २ याचे सांगणेवरुन शासनाने प्रतिबंधित केलेले तंबाखुजन्य/गुटखा पदार्थाचे सेवनाने मुखाचे कर्करोग व इतर विकार होऊन शारिरीक हानी होऊ शकते हे माहित असताना सुध्दा त्याने त्याचे ताब्यातील मारुती सुझूकी कंपनीची सुपर कॅरी छोटा माल वाहतूकीचा टेम्पो नंबर ग्क्त १४ LL ८०९७ मध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा व पानमसालाची विक्रीस बंदी असताना देखील त्याचे उल्लघंन करुन टेम्पो गाडीसह एकुण ९,८१,०००/- रुपये किं. चा माल स्वतःचे फायद्याकरीता, अवैधरित्या खरेदी करुन, जवळ बाळगताना मिळुन आला. म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोउपनि जावळे ७८७५७०४१६२

११

पोस्टे व गु रजि.नं.	:-	बावधन ७४५/२०२६ भारतीय न्याय सांहिता कलम ३०३(२) प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि.२२/११/२०२६ रोजी २३/४५ वा ते दि.२३/११/२०२६ रोजी सकाळी ०६/०० वाचे सुमा.विश्वास काळे यांचे जागेत लवळे रोड नांदे गाव ता.मुळशी जि. पुणे
गुन्हा दाखल	:-	दि २३/११/२०२६ रोजी २०.३९ वा
फिर्यादी	:-	श्री. संकेत ज्ञानदेव वांडेकर वय २० वर्ष धंदा व्यापार रा. विश्वास काळे यांचे जागेत भाडयाने लवळे रोड नांदेगाव ता. मुळशी जि. पुणे.
आरोपी	:-	अज्ञात इसम
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची २,००,०००/- रुपये किंमतीचा महिंद्र कंपनीचा बलेरो पिकअप एम एच १६ ए वाय ९३२१ ही लॉक व पार्क करून ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने माझ्या संमतीशिवाय, लबाडीचे इरादयाने चोरून नेला. म्हणून
त.अधिकारी/अंमलदार	:-	श्रेणीपोउपनि मारणे ८९७५७५१९६०